**स्वासिन लघु पाटबंधारे योजना**
**ता.मंगरूळपीर जि. वाशिम**
**योजनेस प्रथम सुधारीत प्रशासकीय**
**मान्यता प्रदान करणेबाबत.**

# विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर

**महामंडळ निर्णय क्रमांक:१२ विपाविम/कातां ७(१)/ (धा.क्र.९/२०१७)/ स्वासिन लपायो /प्रथम सुप्रमा / २०१८,**
**दि. ०८/०१/२०१९**

**पहावे :-** १. शासन निर्णय जलसंपदा विभाग क्र. संकिर्ण-२०१५/(३५/२०१५)/जसं(आ), दि. ९.९.२०१५.
२. विपाविम नियामक मंडळाचे ७१ व्या बैठकीतील ठराव क्र. ७१/५

**प्रस्तावाना :**

स्वासिन लघु पाटबंधारे योजना, ता.मंगरूळपीर, जि. वाशिम या योजनेस विपाविम निर्णय क्र. विपाविम/ कातां ७/२२/स्वासीन/प्रमा/(४७/२००८) दि. ३०.०१.२००९ अन्वये रू. १३८६.०० लक्ष (रू. तेरा कोटी, शहाऐंशी लक्ष फक्त) इतक्या किंमतीस (दरसुची २००८-०९ वर आधारीत) मुळ प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली होती.

बांधकामाचे दरम्यान योजनेच्या खर्चात दरसुचीतील बदलामुळे झालेली वाढ, जास्त दराच्या निविदा स्विकृतीमुळे वाढ, भुसंपादन खर्चातील वाढ, संकल्पनातील बदल , इतर कारणे व अनुषंगिक खर्च इत्यादी कारणामुळे वाढ झाली असून योजनेची अद्यावात किंमत प्रशासकीय मान्यता किंमतीच्या दहा टक्क्याहून अधिक वाढत असल्यामुळे व सदर प्रकल्प मा. राज्यपाल महोदयांच्या सिंचन अनुशेष निर्मुलन कार्यक्रमा अंतर्गत असल्याने प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करणे आवश्यक झाले आहे .

**विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाचा निर्णय :**

विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ आता या निर्णयान्वये वाशिम जिल्ह्यातील स्वासिन लघु पाटबंधारे योजना, ता.मंगरूळपीर जि. वाशिम या योजनेच्या एकूण अंदाजित खर्च रू. ६७४४.०० लक्ष (रू. सदुसष्ट कोटी, चौरेचाळीस लक्ष फक्त) किंमतीस प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करीत आहे. त्यापैकी रू. ६४३३.०० लक्ष (रू. चौसष्ट कोटी, तेहत्तीस लक्ष फक्त) कामाप्रित्यर्थ व रू. ३११ लक्ष (रू. तीन कोटी अकरा लक्ष फक्त) अनुषंगिक खर्च आहे. अंदाजपत्रकात उर्वरीत कामांसाठी सन २०१६-१७ या वर्षाच्या दरसूचीप्रमाणे दर वापरण्यात आले आहेत. उपशिर्षवार तरतुदींचा गोषवारा परिशिष्ट-१ मध्ये संलग्न आहे.

ठळक बाबी –

| | |
|---|---|
| **अ) योजनेचे सिंचन क्षेत्र** | **- ५८८ हेक्टर** |
| **ब) योजनेमुळे एकुण होणारा पाणीसाठा** | **- ३.९२ द.ल.घ.मी. (३९२० स.घ.मी.)** |
| **क) प्रति स.घ.मी. पाणीसाठा किंमत** | **- रू. १,७२,०००/-(मापदंड रू.९५७९०/- प्रति स.घ.मी.) प्रकल्प मापदंडात बसत नाही.** |
| **ड) योजनेचे लाभव्यय गुणोत्तर** | **- ०.७२ (मापदंड १.०० पेक्षा जास्त) प्रकल्प मापदंडात बसत नाही.** |

हा निर्णय संदर्भीय शासन निर्णयातील परिच्छेद १.३ नुसार नियामक मंडळाचे दि. ४.१०.२०१८ रोजी संपन्न ७१ व्या बैठकीतील मान्य झालेल्या ठराव क्र. ७१ / ५ चे अनुषंगाने मा. सचिव उपसमितीने रातांसस, नाशिक यांचे छाननी